| | |
|---|---|
| MHAU040007182021 | दाखल दिनांक : २७.०८.२०२१<br>नोंदणी दिनांक : २७.०८.२०२१<br>निकाल दिनांक : १८.०४.२०२६<br>कालावधी : व. म. दि.<br>०४ ०७ २२ |

भाग अ

अतिरिक्त सत्र न्यायालय, वैजापुर, जि. औरंगाबाद येथील न्यायालयात
(पिठासिन अधिकारी श्रीमती एस. के. उपाध्याय, यांचे समोर)

विशेष खटला क्र. ५७/२०२१ निशाणी क्रमांकः ४९

| | |
|---|---|
| गुन्हा क्रमांक व पोलीस ठाणे | २८२/२०२१<br>वैजापुर पोलीस ठाणे |

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | | महाराष्ट्र शासन, मार्फत - पोलीस निरीक्षक, वैजापुर पोलिस स्टेशन, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद. |
| उपस्थिती | | सरकार तर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता, श्री के.एस.गंडे |
| आरोपी | | सिध्दार्थ संजय पगारे, वय - २७ वर्षे, धंदा - मजुरी, राहणार- सिध्दार्थनगर, चित्तोड रोड, धुळे, जिल्हा धुळे |
| उपस्थिती | | आरोपींतर्फे विधिज्ञ आर.एस.सोनवणे |

विभाग ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १५.०७.२०२१ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १६.०७.२०२० |
| दोषारोप दाखल केल्याचा दिनांक | २६.०८.२०२१ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ११.१२.२०२५ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | २६.०२.२०२६ |
| निकाल आरक्षित केल्याचा दिनांक | .०४.२०२६ |
| निकाल दिल्याचा दिनांक | .०४.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याचा दिनांक | -- |

<u>आरोपीचा तपशिल</u>

| अ. क्रं. | आरोपींची नावे | अटक दिनांक | जामीन दिल्याचा दिनांक | आरोप ठेवलेले दोषारोप | आरोपीला निर्दोष केले किंवा शिक्षा दिली | कोणती शिक्षा दिली | खटल्याचे दरम्यान अटकेचा कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सिध्दार्थ संजय पगारे | २९.०७.२१ | २८.०९.२१ | कलम ३६३, ३६६-अ, ३७६(२)(एन) भा.द.वि व कलम ४, ६, ८ व १२ पोक्सो कायदा | निर्दोष | -- | -- |

<u>भाग क</u>

<u>अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदार यांची यादी</u>.

अ. <u>अभियोग पक्ष</u> -

| अ.क्रं. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्रं.१/नि.क्रं. २६ | पिडीतेची आई | फिर्यादी (फितुर) |
| सा.क्रं.२/नि.क्रं. २९ | पिडीता | अत्याचारीत मुलगी (फितुर) |
| सा.क्रं.३/नि.क्रं.३६ | पो.नि.चंपालाल मदनलाल चरभरे | तपासिक अंमलदार |
| सा.क्रं.४/नि.क्रं.४५ | सुचित कृष्णराव कांबळे | मुख्याध्यापक |

ब. <u>बचावाचे साक्षीदार</u>

| अ.क्रं. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. <u>न्यायालयीन साक्षीदार , जर असल्यास</u>

| अ.क्रं. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

<u>अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन निशाणी क्रमांक</u>

अ . <u>अभियोग पक्ष</u>

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १ | नि.क्रं.२७/सा.क्रं.१ | फिर्यादीची फिर्यादवरील सही |
| २ | नि.क्रं.३०/सा.क्रं.२ | पिडीतेची तिच्या जवाबावरील सही |
| ३ | नि.क्रं.३१/सा.क्रं.२ | पिडीतेची कलम १६४ सीआरपीसी प्रमाणेचा जवाबावरील सही |
| ४ | नि. क्रं.३७/सा.क्रं.३ | पिडीतेचा जवाब |
| ५ | नि.क्रं.३७/अ/ सा.क्र.३ | पिडीतेच्या पुरवणी जवाबमधील अधोरेखांकित भाग-अ |
| ६ | नि.क्रं.३७/ब/सा.क्र.३ | पिडीतेचा १६४ सीआरपीसी प्रमाणेचा जवाब नोंदविण्यासाठी न्यायालयाला दिलेले पत्र |
| ७ | नि.क्रं.३८ व ४०/सा.क्रं.३ | पिडीता व आरोपीचे जप्त कपडेबाबतची मुद्देमाल पावत्या |
| ८ | नि.क्रं.३९/सा.क्रं.३ | जप्ती पंचनामा |
| ९ | नि.क्रं.४१/सा.क्रं.३ | सी.ए.ला आरोपी व पिडीतेचे कपडे तपासणीसाठी पाठविल्याबाबतचे पत्र |

| | | |
|---|---|---|
| १० | नि.क्रं.४२/सा.क्रं.३ | पिडीतेची आईच्या जवाबातील अधोरेखांकित भाग-अ |
| ११ | नि.क्रं.४३/सा.क्रं.३ | पिडीतेचा प्रवेश निर्गत उतारा मिळण्यासाठी शाळेला दिलेले पत्र |
| १२ | नि.क्रं.४४/सा.क्रं.३ | पिडीतेची वैदयकीय तपासणी करण्यासाठी वैदयकीय अधिकारी यांना दिलेले पत्र |
| १३ | नि.क्रं.४६/सा.क्रं.४ | पिडीतेचा प्रवेश निर्गम उतारा |

ब. <u>बचाव पक्षाने मान्य केलेला कागदोपत्री पुरावा</u>

| अ.क्रं. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १ | निशाणी क्रं. ३१/अ | घटनास्थळाचा पंचनामा |
| २ | निशाणी क्रं. ३२ | अटकेचा पंचनामा |
| ३ | निशाणी क्रं. ३३ | जप्ती पंचनामा |
| ४ | निशाणी क्रं. ४७ | पिडीतेचा मेडिको लिगल एक्झामिनेशन रिपोर्ट |

क. <u>न्यायालयीन निशाणी क्रमांक</u>

| अ.क्रं | वस्तु | विवरण |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ड. <u>जप्त वस्तु</u>

| अ.क्रं | जप्त वस्तु | विवरण |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

<u>न्यायनिर्णय</u>
<u>(पारीत दिनांक १८.०४.२०२६)</u>

१. आरोपी विरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३६३, ३६६-अ व ३७६(२)(एन) व प्रोटेक्शन ऑफ चाईल्ड फ्रॉम सेक्सुअल ऑफसेन्स कायदयाचे कलम ४, ५(एल)६ए ८ व १२ प्रोव्हीबिशन ऑफ चाईल्ड मॅरेज ॲक्टन्वये अपराध केल्याचे दोषारोप आहेत.

२. <u>अभियोग पक्षाचे कथन प्रथम माहिती अहवाल प्रमाणे संक्षिप्त स्वरुपात पुढीलप्रमाणे :-</u>

पिडीतेचे आई हिने फिर्याद दिली की ती तिचा पती, मुली व मुलासह फिर्यादमधील नमुद ठिकाणी राहतात. पिडीता ही तिची मुलगी आहे. दिनांक १५.०७.२०२१ रोजी ते सर्व दहा वाजता जेवण करुन झोपले. दिनांक १६.०७.२०२१ रोजी सकाळी ०३.०० च्या सुमारास तिला जाग आली असता तिला पिडीता दिसली नाही म्हणुन तिने घरात आजुबाजुला शोध घेतला असता ती आढळुन आली नाही म्हणुन त्याबाबतची कल्पना तिने तिच्या पतीला दिली. त्यांनी परत तिचा शोध घेतला असता ती मिळुन आली नाही म्हणुन त्यांनी अज्ञात व्यक्तीने पिडीतेस पळवुन नेल्याबाबतची फिर्यादी दाखल केली. .

३. उपरोक्त फिर्यादीवरुन अपराध क्रमांक २८२/२०२१ वैजापुर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आला. सरुवातीला गुन्हयातील तपास हा पोलीस उपनिरीक्षक चंपालाल चरभरे यांनी केला. तपासामधे त्यांनी दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा

केला,साक्षीदारांचे जवाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले, न्यायालयास पत्र देवुन पिडीतेचा कलम १६४ सीआरपीसी प्रमाणेचा जवाब हस्तगत केला. आरोपींना अटक केली, पिडीता व आरोपीचे कपडे जप्त करुन जप्ती पंचनामे तयार केले व मुद्देमला पावती तयार केल्या, पिडीता व आरोपीचे कपडे रासायीनक प्रयोगशाळेत तपासासाठी पाठविले, पिडीतेचा प्रवेश निर्गम उतारा मिळण्यासाठी पत्र देवुन तो हस्तगत केला. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द निशाणी क्रमांक २३ प्रमाणे दोषारोप ठेवले. आरोपीने दोषारोपास कबुली दिली नाही. त्यामुळे त्यांची संपरीक्षा करण्यात आली. सरकार पक्षाने आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरीता एकुण पाच साक्षीदार तपासले.

५. त्यानंतर आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब घेण्यात आला. आरोपीनी त्यांच्या जवाबामधे त्याच्याविरुध्दचे साक्षीदारांनी दिलेले सर्व पुरावा नाकारले व असा बचाव घेतला की, त्याच्या विरुध्द प्रस्तुची खोटी केस दाखल केलेली आहे. आरोपीने बचावार्थ स्वतंत्र पुरावा दिला नाही.

६. अभियोगपक्षाचे युक्तिवाद **:-**

सुविदय सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.गंडे यांनी अभियोग पक्षाने घेतलेल्या पुराव्याकडे लक्ष वेधुन यांनी प्रतिपादन केले की, मुख्याध्यापक सा.क्रं.४ यांच्याकडुन अभियोग पक्षाने पिडीता अल्पवयीन असल्याचे सिध्द केले आहे व तपासिक

अंमलदार सा.क्र.५ यांचा पुरावा फिर्यादीतील कथनाप्रमाणे असुन एकमेकांशी सुसंगत आहे. त्यांनी साक्षीदारांचे जवाब सिध्द केले आहेत. त्यामुळे अभियोग पक्षाने दिलेला मौखिक पुरावा एकमेकांशी सुसंगत आहे. म्हणून त्यांनी प्रतिपादन केले की आरोपीला दोषी धरण्यात यावे.

७. <u>बचावपक्षाचा युक्तिवाद</u> **:-**

प्रत्युत्तरार्थ आरोपींचे सुविदय विधिज्ञ आर.एस.सोनवणे यांनी प्रतिपादन केले की, अभियोग पक्षाचे महत्वाचे साक्षीदार पिडीता व फिर्यादी आरोपीविरुध्द काही एक त्याच्या पुराव्यात सांगीतलेले नाही. तसेच त्यांनी प्रतिपादन केले की अभियोग पक्षाचे साक्षीदार फिर्यादी व पिडीता हे अभियोग पक्षास फितूर झालेले असुन अभियोग पक्षाने फिर्याद सिध्द केलेली नाही. तसेच अभियोग पक्षाने स्वतंत्र साक्षीदार तपासले नाही. सदर पुराव्यावरुन स्पष्ट होत नाही की आरोपीने पिडीतेचे अपहरण करुन तिच्यावर बलात्कार केला, तिचे लैंगिक शोषण केले हे सिध्द होत नाही. त्यांनी प्रतिपादन केले की, अभियोग पक्षाचे कथन अविश्वसनीय असे आहे व म्हणून आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात यावी.

८. न्यायालयाचे विचारात उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसासह खालीलप्रमाणे आहेतः-

| अं.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, कथीत घटनेवेळी पिडीत मुलगी ही बालक होती ? | होय |

| | | |
|---|---|---|
| २ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय दिनांक १६.०७.२०२१ रोजी सकाळी ०३०० वाजता फिर्यादमधील नमुद राहण्याच्या ठिकाणातुन आरोपीने पिडीता अल्पवयीन असतांना तिच्या आईवडिलांच्या अखत्यारीतुन त्याच्या परवानगी शिवाय पिडीतेचे अपहरण करुन भारतीय दंड संहितेच्या कलम ३६३ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला ? | नाही |
| ३ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय वरील दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने पीडितेला तिच्या घरातून अपहरण करुन व तिला आरोपीशी बेकायदेशीर संभोग करण्यास भाग पाडुन भारतीय दंड संहितेच्या कलम ३६६-अ अन्वयेचा शिक्षापात्र गुन्हा केला ? | नाही |
| ४ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय आरोपीने पाचोरा येथील भाडयाच्या खोलीमधे अल्पवयीन पिडीतेवर वारंवाHCDRVKF7001 र बलात्कार करुन भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(२)(जे)(एन) नुसार शिक्षापात्र गुन्हा केला ? | नाही |
| ५ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय वरील कालावधीत आणि ठिकाणी आरोपीने पीडितेवर लैंगिक अत्याचार केले आणि त्याद्वारे पोक्सो कायद्याच्या कलम ४ अंतर्गत गुन्हा केला ? | नाही |
| ६ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय वरील कालावधीत आणि ठिकाणी आरोपीने वर्षीय पीडितेवर तीव्र लैंगिक अत्याचार वारंवार केले आणि त्याद्वारे पोक्सो कायद्याच्या कलम ५(एल)६ पोक्सा कायदया अंतर्गत गुन्हा केला ? | नाही |
| ७ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय आरोपीने पिडीतेला लैंगिकदृष्टया लैंगिक हेतुने त्रास देवुन कलम पोक्सो कायदयाच्या कलम ८ अंतर्गत गुन्हा केला ? | नाही |
| ८ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय आरोपीने पिडीतेला लैंगिक छळवणुक करुन कलम पोक्सो कायदयाच्या कलम १२ अंतर्गत गुन्हा केला ? | नाही |
| ९ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

९. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता एकुण चार साक्षीदार तपासले आहेत.

मुद्दा क्रमांक १ -

१०. पिडीता घटनेच्या वेळी अज्ञान होती हे सिध्द करण्याकरीता सरकार पक्षाने पिडीता, तिची आई व मुख्याध्यापक यांना तपासले. फिर्यादी/पिडीतेची आई सा.क्रं.१ व पिडीता सा.क्रं.२ या दोघींनीही पिडीतेची जन्म तारीख १०.०५.२००४ असे सांगीतले. साक्षीदार क्रं. ४ मुख्याध्यापक यांच्या पुराव्यात त्यांनी सांगीतले की पिडीतेने त्यांच्या शाळेमधे पहिल्या वर्गात प्रवेश घेतला होता. शाळेच्या प्रवेश रजिष्टरप्रमाणे पिडीतेची जम्न तारीख १०.०५.२००४ असुन तिच्या जन्माची नोंद ही तिच्या जन्म प्रमाणपत्रावरुन घेण्यात आली होती व तिच्या प्रवेशाची नोंद रजिष्टरमधे अनुक्रमांक ४ वर आहे.

११. त्यामुळे कलम १२ (३) जे.जे.नियम २००७ मधे उल्लेख केलेला आहे की प्रमाणपत्र पहिल्या शाळेतुन वितरित करण्यात आलेले असल्यास त्या प्रमाणपत्रास मान्यता दिलेली आहे. तसेच कलम ९४ च्या दरुस्तीचा जे.जे.कायदा २०१५ मधे देखील सदरची बाब नमुद केलेली आहे. त्यामुळे वरील नियमांचे अवलोकन केले असता न.पा.दिलेला पिडीतेचा जन्माचा दाखला हा पिडीतेचा वय निश्चित करण्यास मान्य ठरते.

१२. सदर निशाणी ४६ प्रवेश निर्गम उता-याचे अवलोकन केले असता असे निष्पन्न होत आहे की पिडीतेची जन्मतारीख १०.०५.२००४ आहे. साक्षीदार क्रं.४ यांनी प्रवेश रजिष्टर मधे पिडीतेचा प्रवेशाची नोंद क्रं.४ वर घेतल्याचे सांगीतले आहे. निशाणी ४६ चे अवलोकन केले असता घटनेचे वेळीभा पिडीतेचे वय १८ वर्षापेक्षा कमी म्हणजे ती अल्पवयीन असल्याचे दिसुन येते. सबब, घटनेच्या वेळी पिडीता ही अज्ञान होती. म्हणुन मुद्दा क्रमांक १ चे उत्तर मी होकारार्थी नोंदविते.

मुद्दा क्रमांक २ ते ९ करीता -

१३. मुद्दे क्रं. २ ते ९ हे एकमेकांवर अवलंबुन व त्यावरील पुरावा निगडीत असल्याने एकत्रीत कारण मिमांसासाठी पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी विचारार्थ घेतले आहेत.

पुराव्याचे अवलोकन -

१४. प्रथमतः अभियोग पक्षाने फिर्यादी म्हणजेच फिर्यादीच्या आईस तपासले. तिच्या पुराव्यात असे आले आहे की पिडीता ही तिची मुलगी आहे. परंतु तिने घटनेबाबत काही सांगतले नाही. त्यामुळे फिर्यादी/पिडीतेची आई अभियोग पक्षाच्या कथनास सहकार्य करीत नसल्याने तिला फितुर घोषित करुन उलटतपास घेतला असता तिने तिच्या सरकार पक्षाने घेतलेल्या उलटतपासा आरोपीविरुध्द कोणताही पुरावा दिलेला नाही. तिने अमान्य केले की तिच्या फिर्याद मधील मधील अधोरेखांकित भाग-अ हा तिने पोलीसांना सांगीतला होता. तिने हे नाकारले की पिडीताची हरवल्याबाबतची तक्रार तिने दिली होती.

सदरच्या साक्षीदाराने आरोपीस दोषी ठरविण्याइतपत काही सांगीतले नसल्याने तिचा पुरावा अभियोग पक्षाच्या कथनाच्या पुरक पुरावा म्हणता येणार नाही.

१५. अभियोग पक्षाने पिडीतेस निशाणी २९ प्रमाणे तपासले. पिडीतेला घटनेची तारीख व वार सांगता आली नाही. ती सांगते की तीचे तिच्या आईवडीलांशी भांडण झाल्याने ती रागाच्या भरात तिच्या नातेवाईकाकडे गेली होती व ती आरोपीसोबत पाचोरा येथे गेली. परंतु त्यांनतर तिने अभियोग पक्षाच्या समर्थनार्थ पुरावा दिला नाही. तिला घटना कोणत्या तारखेला घडली होती हे सांगता आले नाही. अभियोग पक्षाच्या उलटत्पासात तिने पुर्ण घटना नाकारली आहे. पिडीता नाकारते की पाचोरा येथे गेल्यावर ती व आरोपी रुम घेवुन राहिले व तेथे आरोपीने तिची इच्छा नसतांना तिच्यासोबत शारीरिक संबंध केले. ती पुढे तिच्या साक्षीत सांगीतले की तिचा पोलीसांनी नोंदविलेल्या जवाबातील अधोरेखांकित भाग-अ हा तिने पोलीसांना सांगीतला नव्हता तसेच न्यायालयात १६४ प्रमाणेचा जवाब नोंदविण्यात आला होता परंतु तिने त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगीतले. त्यामुळे पिडीतेचा पुरावा अभियोग पक्षास पुष्ठर्थ व पुरक नाही.

१६. अभियोग पक्षाने पोलीस उपनिरीक्षक चंपालाल मदनलाल चरभरे-सा.क्रं.३ यांना तपासले आहे. सदरचा साक्षीदार तपासिक अंमलदार असुन त्यांनी ज्या रितीने गुन्हयाचा तपास केला त्याप्रमाणे त्यांनी न्यायालयात जवाब दिला आहे. त्यांच्या पुराव्यामधे त्यांनी त्यांनी तपासामध्ये नियमित तपास करुन, आरोपीस अटक केली, घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रामणे नोंदविले, तसेच

पिडीतेचे शाळेतून प्रवेश निर्गम उतारा हस्तगत केले व इतर कागदोपत्री पुरावा गोळा केला व तपास पुर्ण करुन आरोपीविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

१७. अभियोग पक्षास पुरेशी संधी देवुन देखील वैदयकीय अधिकारी यांना तपासण्यास असमर्थ ठरले आहे. वैदयकीय अहवाला निशाणी ४७ आरोपीने मान्य केला आहे परंतु त्यामधे आरोपीविरुध्द शिक्षा देण्यायोग्य पुरावा आलेला नाही. वैदयकीय अधिकारी यांचा अंतिम अहवालात असे नमुद आहे की “There is no evidence of use of force”.

१८. वरील पुराव्याचे अवलोकन केले असता हे स्पष्ट होत आहे की आरोपीने पिडीतेवर तिच्यावर तिच्या समंतीविना वारंवार बलात्कार केला ही बाब सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. तसेच सरकारपक्षाचे महत्वाचे साक्षीदार फिर्यादी/पिडीतेची आई व पिडीता हे अभियोग पक्षाच्या कथनास सहाय्य करीत नसुन ते घटनेबाबत काहीही सांगितलेले नाही.

१९. पिडीतेची आई/ फिर्यादी सा.क्रं.१ व पिडीता दोन्ही महत्वाचे साक्षीदार असुन दोघींनीही फिर्यादमधील उल्लेखाच्या विसंगत पुरावा दिलेला आहे व न्यायालयात साक्ष देत असतांना घटनेबाबत काहीही कथन केलेले नाही. तसेच पिडीतेची न्यायालयात साक्ष नोंदवित असतांना तिचा न्यायालयात कलम १६४ प्रमाणे जवाब नोंदविला होता

परंतु त्यातील मजकुर तिला माहित नाही असे सांगीतले आहे. तसेच फिर्यादी व पिडीतने त्यांच्या जवाबातील अधोरेखांकित भाग हे पोलीसांना सांगीतला नव्हता व तो पोलीसांना का लिहुन घेतला याचे कारण त्यांना सांगता येत नाही असे सांगीतले आहे.

२०. प्रस्तुतच्या खटल्यामधे फिर्यादी/ पिडीतेची आई तिच्या फिर्यादमधील कथनास तसेच पिडीता देखील तिचा पोलीसांनी नोंदविले ला जवाब व न्यायालयात कलम १६४ प्रमाणे नोंदविलेला जवाबाच्या विसंगत पुरावा देत आहेत. त्यामुळे फिर्यादी कडुन तिची फिर्याद सिध्द होवु शकली नाही. पिडीता ही फितुर झाले असल्याने तिचा पुरावा अभियोग पक्षास पुरक ठरलेला नाही. त्यामुळे आरोपीने पिडीता अज्ञान असतांना तिला तिच्या आईवडिलांच्या अखत्यारीतुन त्याच्या परवानगी शिवाय पिडीतेचे अपहरन केले व पिडीता व आरोपी पाचारा येथे नवराबायकोसारखे राहुन आरोपीने पिडीतेच्या संमतीविना वारंवार बलात्कार केला व तिचा लैंगिक छळ केला याबाबतचा कोणताही पुरावा अभियोग पक्षाने अभिलेखावर सादर केलेला नाही. तपासिक अंमलदाराने पिडीता व फिर्यादी यांच्या जवाबामधील अधोरेखांकित जरी सिध्द केले असले तरी तपासिक अंमलदाराचा पुरावा हा परिपुर्ण पुरावा होवु शकत नाही व त्यांचा पुरावा औपचारिक ठरतो.

२१. सबब कथीत घटनेबाबत कुठलाही परीपुर्ण व ठोस पुरावा अभिलेखावर आलेला नाही. म्हणुन असा निष्कर्ष निघतो की, अभियोग पक्ष हे आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करु शकलेले नाही. त्यामुळे आरोपी हा सदर दोषारोपांतुन निर्दोष मुक्त होण्यास

पात्र आहे. म्हणुन मुद्दे क्र. २ ते ८ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र. ९ चे उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येत आहे-

## आदेश

१. आरोपी सिध्दार्थ संजय पगारे यांची भारतीय दंड विधानाचे कलम ३६३, ३६६-अ व ३७६(२)(एन) व पोक्सो कायदयाचे कलम ४, ५(एल)६, ८ व कलम १२ प्रोव्हीबिशन ऑफ चाईल्ड मॅरेज ॲक्ट यातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. जप्त मुद्देमाला फिर्यादीचे कपडे जसे की, एक काळा व लाल रंगाचा टॉप, लाल रंगाची लेंगीन व निळया रंगाची निकर तसेच आरोपीचे निळसर रंगाचा पॅन्ट, काळपट पांढरी रंगाची अंडरपॅन्ट व एक पांढ-या व पिवळसर रंगाचा फुल बाहयाचा शर्ट, अपीलाचा कालावधी संपल्यावर त्याची विल्हेवाट लावावी.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) अन्वये आरोपी यांनी रुपये २५,०००/- चा वैयक्तिक जात मुचलका व जामिनदार दयावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यांत आला.)

Digitally signed by SUSHMA KARUNESH UPADHYAY
Date: 2026.04.18 12:54:34 +0530

दिनांक - १८.०४.२०२६

(श्रीमती एस. के. उपाध्याय)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
वैजापूर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file judgment are same, word to word, as per the original judgment.

Name of the Stenographer : R.V.Kulkarni
Name of the Court : Smt. S. K. Upadhyay, Addl. Sessions Judge,Vaijapur.
Date on which judgment pronounced : 18.04.2026
Date of direct dictation : 17.04.2026
Judgment checked and signed
by the presiding officer on : 18.04.2026
Judgment uploaded on : 18.04.2026